## प्रेसनोट

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ०८/०५/२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिट चे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | श्री.भारत गुलाब सिडाम, वय ४८ वर्षे, पद— सहाय्यक अभियंता, कार्यालय म.रा.वि.वि.कं.मर्या.उपविभाग धारणी, रा.ह.मु.श्री.दिपक सराफ यांचे घरी भाडयाने, शिरभाते नगर, कांडली परतवाडा ता. अचलपूर जि.अमरावती. मुळ पत्ता — एकता चौक रोड, हनुमान मंदीर जवळ, जय हिंद चौक, तुकूंम चंद्रपूर ता.जि.चंद्रपूर. वर्ग —२. |
| ३ | अपराध घडला दिनांक व वेळ | दिनांक ०८/०५/२०२५ रोजी १३/४० ते १३/५५ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | २०,०००/—रुपये |
| ५ | तडजोडीअंती मागणी केलेली लाच रक्कम | १६,०००/— रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | १६,०००/—रुपये |
| ७ | घटनास्थळ | जय भवानी हॉटेल, अमरावती रोड परतवाडा |

**थोडक्यात हकिगत** :— दि.०७/०५/२०२५ रोजी यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, त्यांचे नावे ए.आर.कौशल सोलार (O.P.C.) प्रायव्हेट लिमीटेड कंपनी आहे. या कंपनीच्या माध्यमातुन ते घरोघरी सोलर बसवण्याचे काम घेत असतात. अशाप्रकारे मागील महिन्यामध्ये धारणी येथे चार वेगवेगळया लोकांचे घरी सोलार पॅनल बसवायचा ठेका त्यांना मिळाला होता. त्यासंबधाने धारणी येथील चार ग्राहक यांचेसोबत दिनांक २७/०३/२०२५ रोजी करार झालेला आहे. सदरचे काम हे ते नियमानुसार पुर्ण करून दि.०७/०४/२०२५ रोजी म.रा.वि.वि.कं.कार्यालय, धारणी येथे मिटर रिलीज करण्याकरिता, मिटर रिलीज ऑर्डर काढण्याकरीता तसेच **Inspection approval** करण्याकरीता अर्ज केला आहे. श्री.भारत सिडाम, सहायक अभियंता,म.रा.वि.वि.कं. कार्यालय,धारणी यांचेसोबत सदर कामाबाबत बोललो तेव्हा त्यांनी तक्रारदार यांना म्हटले की, तुझे काम करायचे असेल तर एका फाईलचे ५०००/— रुपये दयावे लागतील व नंतर त्यांना भेटायला ये, त्यावरुन तक्रारदार यांना अशी खात्री आहे की, आलोसे यांनी पैशाची मागणी करण्यासाठीच भेटायला बोलावले आहे परंतु श्री. भारत सिडाम, सहायक अभियंता,म.रा.वि.वि.कं.कार्यालय, धारणी यांना त्यांचे चार कामाचे प्रत्येकी ५००० रु. प्रमाणे असे एकुण २०,०००/—रू. लाच रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांचेवर कायदेशीर कारवाईसाठी तक्रार दिली होती.

सदर तक्रारीवरुन दिनांक ०८/०५/२०२५ रोजीचे पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी मध्ये यातील नमुद लोकसेवक श्री.सिडाम यांनी तक्रारदार यांना त्यांनी म.रा.वि.वि.कं.कार्यालय, धारणी येथे मिटर रिलीज करण्याकरिता, मिटर रिलीज ऑर्डर काढण्याकरीता तसेच **Inspection approval** करण्याकरीता फाईल लवकरात लवकर **Inspection approval** करुन देण्याकरीता व चारही कामाचे तडजोडीअंती प्रत्येकी फाईलचे ४०००/— रुपये प्रमाणे १६,०००/— लाचेची मागणी करुन पंचासमक्ष आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे श्री.भारत सिडाम यांनी तक्रारदार यांचेकडून १६,०००/— लाच रक्कम स्विकारताना लाच रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले आहे. नमुद आरोपींविरुध्द पो.स्टे. परतवाडा, अमरावती ग्रा. येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा. श्री. सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री. अभय आष्टेकर, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, पोलीस उपअधीक्षक श्री.मंगेश मोहोड, पोलीस हवालदार श्री.युवराज राठोड, श्री.राजेश मेटकर, पोलीस अंमलदार श्री. आशिष जांभोळे व चालक पोहवा.श्री.गोवर्धन नाईक, पोहवा राजेश बहिरट यांनी पार पाडली आहे.

नागरीकांनी अशा प्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क : **अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती**
**ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५,टोल फ्रि नंबर—१०६४**

(अभय आष्टेकर)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती.
मो.न. ८२७५०८८७९७.

Scanned by CamScanner